**विशेष दिवाणी दावा क्र. ४८/२०१९**

CNR No. MHSO060005862019

द्रौपदी वाघमोडे

वि.

बिरा कोकरे वगैरे

**आदेश निशाणी क्र. १४ वर**

०१. सोबतच्या यादीप्रमाणे महत्वाची कागदपत्रे दाखल करण्यास वादी यांनी परवानगी मागितली आहे. त्यावर प्रतिवादी यांनी आक्षेप नोंदवला आहे. यादीसोबत वादी हे प्रतिवादी क्र. १ बिरा आणि प्रतिवादी क्र. २ काशीबाई यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल करत आहेत. सदर कागदपत्रे ही झेरॉक्स आहेत. त्यामुळे ते प्रमाणपत्र पुराव्याचे कामी वाचता येणार नाहीत. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे प्रतिवादी यांनी नमूद केले.

०२. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे मृत्यु प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत वादी हे दाखल करत आहेत. झेरॉक्स असल्यामुळे त्यांना निशाणी क्रमांक देता येणार नाही. वादी यांनी केवळ प्रस्तुत मृत्यु प्रमाणपत्र दाखल करण्यास परवानगी मागितली आहे. त्यामुळे सदर कागदपत्र दाखल करुन घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सोबतच्या यादीप्रमाणे कागदपत्रे दाखल करण्यास वादी यांना परवानगी देण्यात येत आहे.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR

Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2022.03.25 12:45:38 +0530

दि. २५/०३/२०२२

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 25/03/2022 |
| Order uploaded on | : | 25/03/2022 |